



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०१ ● अंक : ३४७ ● पुणे ● सोमवार, दि. २८ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




आ. तापकीर चौकार मारण्यासाठी सज्ज!

3



खडकवासल्यात "सचिन "अस्त्र !

4

## ठळक बातम्या

### मनसेला पाठिंब्यावरून पेच

**मुंबई : (आरंभ पर्व)** : मनसेला माहीमसह काही जागांवर पाठिंबा किंवा छुपे सहकार्य करण्यावरून महायुतीमध्ये पेच निर्माण झाला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित ठाकरे माहीममधून विधानसभेची निवडणूक लढवीत असून त्यांच्यासाठी माघार घेण्यास आमदार सदा सरवणकर तयार नाहीत. त्यामुळे यासह महायुतीचे उर्वरित जागावाटप व अन्य मुद्द्यांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिंदे यांच्या ह्य वर्षा ह्य निवासस्थानी झालेल्या बैठकीत चर्चा झाली असून ते मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत.

### मुख्यमंत्र्यांचा आज उमेदवारी अर्ज

**ठाणे : (आरंभ पर्व) :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज, सोमवारी कोपरी- पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. अर्ज दाखल करण्यापूर्वी शिवसेनेकडून (शिंदे गट) मिरवणूक काढत शक्तिप्रदर्शन केले जाणार आहे. या कालावधीत वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी ठाणे वाहतूक पोलिसांनी वाहतूक बदल लागू केले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात ठाकरे गटाचे ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे हे निवडणूक लढवीत आहेत. केदार दिघे हे शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांचे पुतणे आहेत. तेदेखील सोमवारी अर्ज दाखल करणार आहेत. ठाणे शहर विधानसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार संजय केळकर हे अर्ज दाखल करणार आहेत.

# पुणे जिल्ह्यात पवार कुटुंबियांची प्रतिष्ठा पणाला

## २१ पैकी ७ मतदारसंघात परस्परांच्या विरोधात उमेदवार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जिल्ह्यातील 21 विधानसभा मतदारसंघापैकी सात मतदारसंघात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि अजित पवार यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर सात मतदारसंघात राष्ट्रवादी विरोधात राष्ट्रवादी अशा लढती रंगणार आहेत. जिल्ह्याच्या राजकारणात कोणत्या पवारांचे एकहाती वर्चस्व राहणार, यादृष्टीने या लढतींकडे पाहिले जात आहे.



पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर अजित पवार भाजप-शिवसेना शिंदे पक्षाच्या सरकारमध्ये सामील झाले. त्यावेळी पुणे, पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण भागातील अनेक आमदार, नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी अजित पवार यांना जाहीर समर्थन दिले. मात्र, लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांना विशेष प्रभाव दाखविता आला नाही. बारामतीत अजित पवारांच्या पत्नीचा पराभव झाला. त्याउलट राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळाले. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये येण्यासाठी अनेकांची चढाओढ सुरू झाली. अजित पवार यांच्याकडील काही आमदारही शरद पवार यांच्या संपर्कात होते. मात्र, त्यांना पक्षात न घेता शरद पवार यांनी नवे उमेदवार दिले आहेत. त्यामुळे अजित पवार विरोधात शरद पवार अशा लढती सात ठिकाणी होणार आहेत.

अजित पवार यांना स्वत: बारामतीमधून त्यांचे पुतणे, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे युवा नेते युगेंद्र पवार यांचे कडवे आव्हान राहणार आहे. शिरूरमध्ये राष्ट्रवादी अजित पवार पक्षाने शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख माऊली कटके यांना पक्षात घेत उमेदवारी दिली आहे.

शेळके यांचे विद्यमान आमदार अशोक पवार यांना आव्हान असणार आहे. इंदापूरमध्ये माजी मंत्री, भाजपने हर्षवर्धन पाटील यांना पक्षात घेऊन शरद पवार यांनी महायुतीला धक्का दिला आहे. इंदापूरमध्ये अजित पवार समर्थक आमदार दत्तात्रय भरणे आणि हर्षवर्धन पाटील अशी लढत होणार आहे. आंबेगाव तालुक्यात अजित पवार यांचे समर्थक दिलीप वळसे पाटील यांना त्यांचे एकेकाळचे सहकारी देवदत्त निकम राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून आव्हान देणार आहेत.

जुन्नर विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे आमदार अतुल बेनके यांच्याविरोधात विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक सत्यशील शेरकर आहेत. सत्यशील शेरकर काँग्रेसचे उमेदवार होते. मात्र, त्यांना पक्षात घेऊन शरद पवार यांनी उमेदवारी जाहीर केली आहे. शहरातील हडपसर मतदारसंघात राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे आमदार चेतन तुपे विरोधात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप असा सामाना रंगणार आहे. तर वडगावशेरी मतदारसंघात अजित पवार समर्थक आमदार सुनील टिंगरे यांच्यापुढे राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी आमदार बापूसाहेब पठारे यांचे आव्हान असणार आहे. बापूसाहेब पठारे यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली असून शरद पवार यांनी त्यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या सात ठिकाणी पवार कुटुंबीयांची प्रतिष्ठा पणाला लागली असून या सात लढती राष्ट्रवादीचे जिल्ह्यातील वर्चस्व ठरविणार आहेत.

# ‘मविआ’त छोट्या पक्षांची बंडखोरी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

विरोधकांच्या महाविकास आघाडीत (मविआ) जागा वाटपाचे त्रांगडे निर्माण झाले असून छोट्या पाच पक्षांनी आपल्या वाट्यास न आलेल्या मतदारसंघांतही उमेदवारी दाखल केली आहे. उद्यापर्यंत आमच्या जागा सुटल्या नाहीत तर मैत्रीपूर्ण लढतीचा किंवा बंडखोरीचा पर्याय आमच्यासमोर असल्याचे सांगत या छोट्या पक्षांनी ‘मविआ’मध्ये बंडाचा झेंडा फडकवला आहे. ‘मविआ’ मध्ये 9 पक्ष आहेत. भारतीय कम्युनिस्ट (भाकप) पक्षाला शिरपूर एकच जागा दिली आहे. पण, हा पक्ष वणी, भिवंडी पश्चिम, औरंगाबाद मध्य, हिंगणा, विक्रमगड येथे उद्या उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला (माकप) दोन जागा मिळाल्या आहेत. पण, हा पक्ष सोलापूर मध्य आणि नाशिक पश्चिम मतदारसंघात उद्या उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.



समाजवादी पक्षाला भिवंडी पूर्व आणि शिवाजीनगर- मानखुर्द या दोन जागा सोडल्या आहेत.

पण, हा पक्ष मालेगाव मध्य, भिवंडी पश्चिम आणि धुळे या अधिकच्या तीन मतदारसंघात उमेदवारी दाखल करणार आहे. धुळे व मालेगाव मध्य काँग्रेसला आणि भिवंडी पश्चिम शिवसेनेला (उद्धव ठाकरे) देण्यात आलेला आहेत.

शेतकरी कामगार पक्षाचा (शेकाप) पनवेल, उरण, अलिबाग, पेण, लोहा आणि सांगोला या मतदारसंघावर दावा आहे. मात्र उरण आणि सांगोला हे मतदारसंघ शिवसेनेला (उद्धव ठाकरे) जाहीर झाले आहेत. या सहा जागा लढवण्यावर ‘शेकाप’ ठाम आहे.

**मैत्रीपूर्ण लढती :** सोलापूर मध्य येथे नरसय्या आडम यांच्यासाठी ‘माकप’ मैत्रीपूर्ण लढत करण्याच्या विचारात आहे. छोट्या पक्षांनी बोलणी करताना एकत्र जायचे असा निर्णय घेतला होता. मात्र छोट्या पक्षांशी प्रमुख तीन पक्षांकडून वेगवेगळी चर्चा करण्यात आली. त्यातून डाव्या पक्षांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.






# उमेदवारी अर्जांसाठी अखेरचे दोन दिवस

## महायुती, मविआतील घोळ मात्र अद्याप कायम



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अखेरचे दोन दोन दिवस शिल्लक असतानाही महायुती आणि महाविकास आघाडीतील घोळ संपलेले नाहीत. दोन्ही आघाड्यांतील सर्वच पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंडखोरी झाली आहे. बंडोबांना शांत करण्याची मोहीम पक्षांच्या नेत्यांना हाती घ्यावी लागली आहे. महायुतीतील जागावाटपाचा तिढा कायम असतानाच महाविकास आघाडीतील सुंदोपसुंदीही चव्हाट्यावर आली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मंगळवारपर्यंत मुदत असली तरी महायुती आणि महाविकास आघाडीत अजूनही जागावाटपाचा घोळ सुरू आहे. महायुतीतील तिढा सोडविण्याकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात बराच खल झाला. भाजप, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार) हे तीन पक्ष किती नेमक्या जागा लढणार हे अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. महाविकास आघाडीतही जागावाटपाचा घोळ सुरूच आहे. शिवसेना (ठाकरे) आणि काँग्रेसमधील वाद मिटण्याची लक्षणे नाहीत. परिणामी महाविकास आघाडीत काही जागांवर मैत्रीपूर्ण लढतींची शक्यता निर्माण झाली आहे. काँग्रेसने दावा केलेल्या मतदारसंघांमध्ये शिवसेनेने उमेदवार जाहीर केल्याने काँग्रेसमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटली. काँग्रेस नेत्यांचा दिवसभर खल सुरू होता. सोमवारपर्यंत तोडगा न निघाल्यास मंगळवारी काही मतदारसंघांमध्ये शिवसेनेच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तयारी काँग्रेसने केली आहे. शिवसेनेच्या आडमुठ्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीत तिढा निर्माण झाल्याचे काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे. काँग्रेस आणि शिवसेनेतील वाद वाढला असताना राष्ट्रवादीचे (शरद पवार) नेते सारी मजा बघत आहेत. शरद पवार यांनी मध्यस्थी करावी, अशी काँग्रेस व शिवसेनेच्या नेत्यांची भूमिका आहे.

भाजप नेते रावसाहेब दानवे यांच्या मुलाला भाजपने उमेदवारी दिली असताना मुलीने शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला. एकूणच इच्छुकांची संख्या लक्षात घेता सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना सर्वांचे समाधान करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. सोमवार व मंगळवार हे दोन दिवस राजकीय घडामोडींच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उद्या, सोमवारी कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या वेळी मोठ्या प्रमाणावर शक्तिप्रदर्शन केले जाणार आहे.

### घालमेल आणि पक्षांतरे

मुदत संपत आल्याने उमेदवारी जाहीर न झालेल्या इच्छुकांमधील घालमेल वाढली आहे. उमेदवारी न मिळालेले अन्य पर्यायांचा विचार करीत आहेत. उमेदवारीसाठी दुसऱ्या पक्षाचा झेंडा हाती घेण्यासाठी सर्वच पक्षांमध्ये गर्दी वाढली आहे. भाजपकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता मावळल्याने दिवंगत आमदार राजेंद्र पटणी यांच्या मुलाने राष्ट्रवादीत (शरद पवार) प्रवेश केला. विविध पक्षांमधील इच्छुकांचा दिवसभर अशाच पद्धतीने प्रवास सुरू होता.






# मराठवाड्यात पाण्याची तूट भरून निघणार...

*इंग्रजांच्या तावडीतून भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर तब्बल एक वर्षांनी मराठवाडा स्वतंत्र झाला. त्यानंतर आजपर्यंत मराठवाड्यातील पाणी प्रश्न कोणतेही सरकार सोडवू शकले नाही; परंतु राज्य मंत्रिमंडळाची शेवटची बैठक मराठवाड्यासाठी फलदायी ठरली. राज्य मंत्रिमंडळाचा हा निर्णय स्वागतार्ह आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे मराठवाड्यातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी मदत मिळेल, अशी प्रतिक्रिया या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी देत आहेत. गोदावरी खोऱ्यातील 115 टीएमसी तूट भरून काढण्यासाठी अरबी समुद्रात वाहून जाणाऱ्या पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळते करण्याची मागणी सातत्याने होत होती. तत्कालीन राज्यपाल, मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्र्यांकडे याबाबत वारंवार पाठपुरावा केला जात होता.*

11 फेब्रुवारी 2019 रोजी झालेल्या राज्य जलपरिषदेत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्याची तूट भरून काढण्यासाठी निर्देश दिले होते. याबाबतच्या निर्णयावर महायुती सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली आहे. दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्पास मान्यता देण्यात आल्याने ही मराठवाड्यासाठी आनंदाची बाब मानली जात आहे. मराठवाड्यातील 10 हजार 11 हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड योजनेस तसेच दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड योजनेस शेवटच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. दमणगंगा – एकदरे – गोदावरी या योजनेतून मराठवाड्यातील लाखो शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. या योजनेतून 10 हजार 11 हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होईल. तसेच 68 दलघमी पाणी सिंचनासाठी, 13.76 दलघमी पाणी पिण्यासाठी आणि 9.17 दलघमी पाणी उद्योगासाठी उपलब्ध होणार आहे. यापूर्वी दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी कोकणातून पाणी वळविण्याच्या योजनांना मान्यता देण्यात आली आहे. आंतरराज्यीय दमण गंगा – पिंजाळ, नदीजोड प्रकल्प व नारपार गिरणा नदी योजना, पार गोदावरी, दमणगंगा- वैतरणा – गोदावरी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या नदीजोड प्रकल्पांना राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांची किंमत 2 हजार 213 कोटी रुपये आहे. दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड योजनेच्या 13 हजार 497 कोटी किमतीच्या प्रकल्पासदेखील मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प दमणगंगा आणि वैतरणा उपखोऱ्यातील 5.68 टीएमसी अतिरिक्त पाणी स्थानिक वापरासाठी तसेच नाशिक जिल्ह्यातील अवर्षणप्रवण सिन्नर तालुका आणि मराठवाड्यातील जायकवाडी प्रकल्पाच्या लाभ क्षेत्राला याचा लाभ होईल. भारताच्या स्वातंत्र्यापासून आजपर्यंत एवढा मोठा निर्णय मराठवाड्याच्या बाबतीत घेण्यात आला नव्हता; परंतु हा निर्णय मराठवाड्याचा कायापालट करणारा ठरणार आहे. छत्रपती संभाजीनगरमधील शनी देवगाव येथील उच्च पातळी बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. हा बंधारा गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत गोदावरी खोऱ्यात असून, या प्रकल्पामुळे 8.84 दलघमी पाणीसाठा निर्माण होणार आहे. त्यामुळे 1,978 हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळेल, या बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील नादुरुस्त अवस्थेतील कमालपूर व खानापूर या कोल्हापुरी बंधाऱ्यांचा पाणी वापर शनी देवगाव बंधाऱ्यातून करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील माहूर निकटच्या पैनगंगा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्याच्या मंजुरीसाठी हिंगोलीचे तत्कालीन खासदार हेमंत पाटील यांनी प्रयत्न केले होते. हा बंधारा गत वर्षीच त्यांच्या कार्यकाळात मंजूर करून घेतला होता. तीर्थक्षेत्र माहूरची पेयजल समस्या मार्गी लागण्यासाठी पैनगंगा नदीवर उच्च पातळी बंधारा निर्माण करावा अशी मागणी गत 8 ते 10 वर्षांपासून प्रलंबित होती. मात्र तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशाने हिवाळी अधिवेशनात गत आठवड्यात माहूर लगतच्या पैनगंगा उच्च पातळी बंधाऱ्या संदर्भात मुख्य सचिव दीपक कपूर यांच्या कक्षात बैठक होऊन डिसेंबर 2023 मध्ये हा विषय मार्गी लागला होता. त्याच वेळी भूसंपादन करण्याचे आदेश सुद्धा जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. मराठवाड्यातील पाणी विषयक प्रश्न मार्गी लागल्याने भविष्यात सरकार कोणाचेही येवो; परंतु येथील नागरिकांची पाण्याची सोय होणार आहे हे निश्चित. 45 वर्षांनंतर दुरुस्ती पैठण येथील जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या दुरुस्तीसाठी राज्य सरकारकडून 700 कोटी रुपये मिळणार आहेत. 45 वर्षांनंतर दुरुस्तीची मागणी मान्य केली आहे. शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या या मागणीसाठी 45 वर्षांचा कालावधी लागतो, या वरून मराठवाड्याच्या विकासाचा अंदाज लावता येतो. राज्य सरकारने राज्यातील विविध धरणे आणि कालव्यांच्या दुरुस्तीसाठी महाराष्ट्र इरिगेशन इम्प्रुमेंट प्रोग्राम ही पंचवार्षिक योजना आणली आहे. यात जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यासाठी दुसऱ्या टप्प्यात 700 कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि परभणी असा सुमारे 208 किलोमीटर लांबीचा हा कालवा आहे. या तिन्ही जिल्ह्यांतील सुमारे 1लाख 44 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आणली आहे. या कालव्याची मागील 45 वर्षांत दुरुस्ती झाली नाही. परिणामी कालव्यात आणि कालव्यावर ठिकठिकाणी झाडी, झुडपे उगवली. एवढेच नव्हे, तर कालव्याचा सरफेस उखडला आहे. परिणामी कालव्याची पाणी वहन क्षमता 50 टक्के कमी झाली आहे. जायकवाडीतून सिंचनासाठी 20 दिवसांच्या एका आवर्तनास आता सुमारे 40 दिवसांचा कालावधी लागतो. ही बाब लक्षात घेऊन डाव्या कालव्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांची मागणी आहे. या मागणीची दखल घेत दीड वर्षांपूर्वी डाव्या कालव्याचे सर्वेक्षण करण्यात आले. तेव्हा डावा कालवा आणि त्याच्या मुख्य आणि उपवितरिकांची नव्याने बांधणी करणे गरजेचे असल्याचा अहवाल सुचविण्यात आला. महाराष्ट्र इरिगेशन इम्प्रुमेंट प्रोग्राममध्ये जायकवाडी प्रकल्पासाठी दुसऱ्या टप्प्यात 700 कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठवाड्याचा विकास करत असताना नेते मंडळी या मागणीसाठी कमी पडले, म्हणून कालवा दुरुस्तीची मागणी 45 वर्षांनंतर मान्य झाली आहे.

# खेड आळंदी विधानसभा निवडणूक प्रशिक्षण संपन्न

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**
निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाकडून आलेल्या सर्व सूचनांचे, नियमांचे पालन करून निवडणूक कामकाज अधिक जबाबदारीने व संवेदनशीलतेने करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी केले. ते येथील महात्मा गांधी विद्यालयात आयोजित खेड आळंदी विधानसभा मतदारसंघ अंतर्गत विधानसभा निवडणूक 2024 करीता नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणात बोलत होते.



याप्रसंगी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार ज्योती देवरे, निवडणूक नायब तहसीलदार डी.पी.माळी, मदन जोगदंड, राम बिजे उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना मतदानाच्या आदल्या दिवशी नियमानुसार मतदान केंद्र तयार करून घेणे, मतदानाच्या दिवशी मॉक पोल घेऊन उपस्थित उमेदवारांच्या प्रतिनिधीना आकडे दाखवणे व सीआरसी करून मतदान शून्य झालेचे दाखवणे. मगच मतदान प्रक्रिया आरंभ करणे, मतदान केंद्रावर फक्त मतदान केंद्रप्रमुख व क्षेत्रीय अधिकारी या व्यतिरिक्त कुणालाही मोबाईल वापरण्यास परवानगी नाही, निवडणूक अनुषंगाने कायदेशीर तरतुदीसाठी महत्त्वाच्या अधिनियम, विधानसभा निवडणूकीतील बदल, मतदानादरम्यान भरावयाचे विविध नमुने यांची माहिती दिली. सहायक निवडणूक अधिकारी ज्योती देवरे यांनी निवडणूक प्रक्रियेची सविस्तर माहिती देऊन पीपीटी सादरीकरणाच्या आधारे कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले.

दि. 26 व 27 रोजी आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षणात 2485 कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

महात्मा गांधी विद्यालयातील 26 वर्गखोल्यांमध्ये किमान 50 कर्मचाऱ्यांचे गट तयार करून त्यांना क्षेत्रिय अधिकारी, तलाठी व मास्टर ट्रेनर यांच्या माध्यमातून निवडणुकीचे कामकाज व ईव्हीएम व व्ही. व्ही. पॅट हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. सर्व कर्मचाऱ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली.

मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण 9 व 10 नोव्हेंबर 2024 रोजी होईल, असे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांनी सांगितले.

## स्प्रिंग रनिंग चॅम्पियनशिप 2024 मध्ये वरुन काकडेला यश




**उरूळी कांचन (दै. आरंभ पर्व)**
पुणे येथे नुकत्याच स्केटीथेलॉन आणि वेव्हबोर्ड स्पोर्ट्स महाराष्ट्र संघटना यांच्यातर्फे घेण्यात आलेली स्प्रिंग रनिंग चॅम्पियनशिप 2024 या स्पर्धेमध्ये येथील इनोसन्ट टाईम्स स्कूलचा विद्यार्थी वरुन काकडे याला रनिंग रेस मध्ये विशेष पदक मिळाले. वरुन ने सात वर्षाखालील गटामध्ये 200 मीटर रनिंग रेस अगदी उत्साहात पूर्ण केली. वरुनला क्रीडा शिक्षक श्री. धनंजय मदने यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल इनोसन्ट टाईम्स स्कूलच्या आदर्श मुख्याध्यापिका -डॉ.अंकिता संघवी, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वरुन आणि त्याच्या आईबाबांचे अभिनंदन केले.

## 'एलिफंट टेल्स ऑफ इंडिया' कलाकृती बनली आकर्षणाचा केंद्रबिंदू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे येथील फिनिक्स मॉल ऑफ मिलेनियम तर्फे दिवाळी निमित्त कला, संस्कृती, परंपरा आणि उत्सवाचे सुंदर मिश्रण असलेल्या 'एलिफंट टेल्स ऑफ इंडिया' या आकर्षक कलाकृतीचे अनावरण करण्यात आले.
ही कलाकृती सध्या पिंपरी चिंचवड आणि वाकड येथील रहिवाश्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनली आले. जगातील सर्वात मोठे हस्तिदंत असलेल्या एका भव्य कलाकृती या ठिकाणी साकारण्यात आली आहे , जे 40 फूट लांब आणि भारतीय इतिहासाच्या प्रमुख कालखंडांचे प्रतिबिंब असलेल्या डिझाईन्स, कोरीवकाम आणि अलंकारांनी सुशोभित केलेले आहे.



फिनिक्स मॉल ऑफ मिलेनियमचे केंद्र संचालक विक्रम पै म्हणाले कि , "या दिवाळीच्या हंगामात 'एलिफंट टेल्स ऑफ इंडिया' लाईव्ह करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. "भारतीय संस्कृतीची समृद्धी प्रतिबिंबित करणारा अनुभव निर्माण करणे आणि सर्व वयोगटातील अभ्यागतांना हि विशेष आकर्षण देणे हे आमचे ध्येय होते. आम्हाला आशा आहे की ही नेत्रदीपक सजावट प्रत्येकासाठी आनंद, आश्चर्य आणि एकजुटीची भावना आणेल. आमच्या सर्व हितचिंतकांना अत्यंत आनंदी आणि समृद्ध दिवाळीच्या शुभेच्छा ". रात्रीच्या वातावरणात भर घालणारी 100 फूट लांबीची प्रकाशयोजना या ठिकाणी असून परेड ऑफ लाइट्स अशी या प्रकाशयोजनेची संकल्पना आहे. याच ठिकाणी त्याच्या मध्यभागी 100 फूट उंचीची भव्य प्रकाश बोगदा कमान आहे हा प्रकाशमय बोगदा हा हत्तींच्या आकृत्यांनी उजळलेला असून जो अभ्यागतांना दिवे आणि संस्कृतीचा अविस्मरणीय प्रवासाचा जाणीव करून देतो. प्रसिद्ध टीव्ही कलाकार आणि बिग बॉस सीझन 1 च्या स्पर्धक स्मिता गोंदकर यांनी या याचे उदघाटन केले.

या ठिकाणी साकारलेला बोधिवृक्ष, चमकदार पिवळ्या पानांसह भारतीय परंपरेची समृद्धी दर्शविते. नॉर्थ बुश परिघातील गतिमान हत्तींची शिल्पे एक वेगळाच अनुभव देतात, तर बाहेरील बाजूस हत्तींच्या आश्चर्यकारक संरचनांनी सुशोभित केले आहे.

# "मला जे आवडेल ते मी पोस्ट करेन!"



- **नेटफ्लिक्सच्या द ग्रेट इंडियन कपिल शोमध्ये काजोलने तिच्या मुलांचे इन्स्टाग्राम पोस्टबद्दलचे नियम तोडल्याबद्दल एक किस्सा शेयर केला**

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
गेल्या आठवड्यात फॅब्युलस लाइव्ह्स वर्सेज बॉलीवूड वाइव्ज शो मधील कलाकारांच्या ग्लिझ आणि ड्रामाचा आनंद घेतल्यानंतर, नेटफ्लिक्सच्या द ग्रेट इंडियन कपिल शोचा आणखी एक रोमांचक एपिसोड येत आहे! यावेळी, दो पत्ती या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे कलाकार काजोल देवगण, कृती सेनन, शाहीर शेख आणि दिग्दर्शिका कनिका धिल्लन हे द ग्रेट इंडियन कपिल शोच्या कप्स कॅफेचे स्पेशल गेस्ट आहेत. जिथे तुम्हाला भरपूर हसयला आणि पडद्यामागील काही मनोरंजक किस्से ऐकायला मिळतील!

काजोलने तिच्या इंस्टाग्राम गेममुळे तिची मुलगी कशी इम्प्रेस नाही, याबद्दल एक मजेदार किस्सा शेअर केला आहे.

जेव्हा कपिलने काजोलला विचारले की तिच्या इंस्टाग्रामवर कोणते फोटो अपलोड करायचे हे कोण ठरवते ती स्वतः कि तिची मुले, तेव्हा तिने उत्तर दिले, “हे मी स्वतः ठरवते. माझ्या मुलांनी ठरवले आहे की माझा जो सेंस ऑफ ह्यूमर आहे, तो त्यांच्या समजण्याच्या पलीकडे आहे. (मेरे बच्चों मुझसे तंग आ गए है) माझी मुलगी मला नुकतीच म्हणाली होती की, "मी तुला समजू शकत नाही आहे! तू इंस्टाग्रामवर काय पोस्ट करत आहे हे मला समजत नाही.” म्हणून मी तिला म्हणाली, अच्छा ठीक आहे, मग मला जे आवडेल ते मी इन्स्टाग्रामवर पोस्ट करेल!” काजोलचा इंस्टाग्राम गेम खरोखरच अनोखा आहे आणि आम्ही आमच्या क्वीनच्या पाठीशी उभे आहोत! पडद्यामागील अशाच आणखी काही गोष्टी जाणून घेण्यासाठी, या शनिवारी रात्री 8 वाजता, द ग्रेट इंडियन कपिल शो पहा, फक्त नेटफ्लिक्सवर!

## थोडक्यात



### गीत ध्वनीमुद्रणाने सामाजिक चित्रपट 'निर्धार'चा मुहूर्त

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला आणि ती गोष्ट साध्य करण्याचा निर्धार केला की, अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टीही शक्य होतात. अशाच निर्धाराची गोष्ट 'निर्धार' या आगामी सामाजिक मराठी चित्रपटात पाहायला मिळणार आहे. नुकताच गीत ध्वनीमुद्रणाने 'निर्धार' चित्रपटाचा मुहूर्त करण्यात आला. आज समाज नव्हे, तर संपूर्ण देशाला पोखरणाऱ्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर हा चित्रपट भाष्य करतो. या चित्रपटातील तरुणांनी भ्रष्टाचाराचा समूळ नायनाट करण्याचा 'निर्धार' केला आहे. हा 'निर्धार' रुपेरी पडद्यावर सादर करण्याचे काम या चित्रपटाद्वारे निर्मात्यांनी केला आहे. देशातील ज्वलंत मुद्द्यावर भाष्य करण्याचा, किंबहुना तो कसा नष्ट होईल हे सांगण्याचा प्रयत्न 'निर्धार' या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक आणि लेखकांनी फार सुंदररित्या केला आहे. जयलक्ष्मी क्रिएशन या निर्मिती संस्थेअंतर्गत निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी 'निर्धार' चित्रपटाची निर्मिती केली आहे. दिलीप भोपळे यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होणाऱ्या या चित्रपटाचं लेखन दीनानाथ वालावलकर यांनी केलं आहे. जुहू येथील आजिवासन स्टुडिओमध्ये 'निर्धार'मधील महत्त्वपूर्ण गाणं रेकॉर्ड करून चित्रपटाचा मुहूर्त करण्यात आला. या प्रसंगी चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार, गायक, संगीतकार, तंत्रज्ञ तसेच सिनेसृष्टीतील काही मान्यवर उपस्थित होते.

### खेड-आळंदीतून विधानसभा उमेदवारीसाठी 75 अर्जांची विक्री

**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** राजगुरूनगर येथील खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारीसाठी चार दिवसांत 32 जणांनी 75 अर्ज खरेदी केले आहेत. विक्री झालेल्यांपैकी आत्तापर्यंत 6 जणांनी प्रत्यक्ष अर्ज दाखल केल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी दिली. दरम्यान, आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी सोमवारी (दि. 28) अर्ज दाखल करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून जाहीर करण्यात येणाऱ्या उमेदवाराबाबत तालुक्यात प्रचंड उत्सुकता ताणली आहे.

### पद्मश्री डॉ मणिभाई देसाई गडकिल्ले स्पर्धा 2024

**उरूळी कांचन (आरंभ पर्व) :** छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या आरमारातील उभारलेल्या आरमारातील जहाजे कोणती व कशी होती. त्यांच्या तब्बल 18 प्रतिकृती संपूर्ण माहितीसह इंग्रज, डच, पोतृगीज यांच्या बलाढ्य आरमाराचा स्वराज्याच्या आरमाराने कसा पराभव केला. त्या साठी कोणती रणनीती वाफरली याची यशोगाथा. भारतात नौकानयाची सुरुवात ते भारतीय नौदलापर्यंत वैभवशाली प्रवास. शिवकाळा आधी प्राचीन राजवंश व सम्राटांच्या आरमाराची माहिती. इंग्रज, डच, पोतृगीज यांच्या आरमारी जहाजाच्या प्रतिकृती. सिंधुसंस्कृती काळातील नौकानयन, आरमार, कोष, जहाजांचे प्रकार व नावे. स्वराज्याच्या आरमाची युद्धनीती दर्शविणारे फोटो अल्बम. स्वराज्याचे आरमार प्रदर्शन रविवार दि.3 नोव्हेंबर ते सोमवार दि.4 नोव्हेंबर 2024 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 8 वाजेपर्यंत बस स्टॉप उरूळी कांचन याठिकाणी इतिहास अभ्यासक महेश पवार यांच्या संकल्पनेतून 'स्वराज्याचे आरमार प्रदर्शन' आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संदिप नारायण कांचन यांनी दिली. संघर्ष प्रतिष्ठान वतीने 'गडकिल्ले' नोंदणी करण्यासाठी 9970715717 या मो.नं.वर आपले नाव पत्ता शुक्रवार दि.1 नोव्हेंबर पर्यंत पाठवावेत अशी माहिती अनिरुद्ध पवार यांनी दिली.

# थोडक्यात




## एंजल हायस्कूल उरुळी कांचनचा स्तुत्य उपक्रम

**उरुळी कांचन (आरंभ पर्व) :** दिवाळी सण सर्वांच्या आनंदाला उत्साह आणणारा सण आहे. हाच आनंद समाजातील गरजु कुटुंबापर्यंत पोहोचला पाहिजे या हेतूने एंजल ग्रुप ऑफ स्कूलचे सचिव अग्निहोत्री यांच्या संकल्पनेतून व अविनाश सेलुकर यांच्या मार्गदर्शनातून एंजल शाळेच्या परिसरात सुमारे 50 कुटुंबांना दिवाळी आनंद द्विगुणित करता यावा म्हणून एंजल शाळेतर्फे या कुटुंबास दिवाळीचा शिधा वाटप करण्यात आला. यामध्ये ऊस तोडणी कामगार, गवंडी कामगार, गरजु शेतमजूर यांना दिवाळीच्या निमित्ताने भेट म्हणून शिधावाटप करण्यात आला. यावेळी शिधा स्वीकारताना त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले शिधा घेताना त्यांची कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक चेतन सोनवणे, जेष्ठ समाजसेवक डॉ. रविंद्र भोळे यांच्या हस्ते शिधावाटप झाले. एंजल शाळेचे विद्यार्थी यांनी उपक्रमामध्ये उस्फुर्त सहभाग दाखवला.

## लोकशाहीर पठ्ठे बापूराव ह्यांच्या सुनेचा एकमेव कायदेशीर वारस



**पुणे (आरंभ पर्व) :** विसाव्या शतकाचा कालखंड म्हणजे तमाशाचा सुवर्णकाळ. पठ्ठे बापूराव नावाचे 'मिथक' निर्माण झाले ते याच कालखंडात. लावण्यांचे विद्यापीठ असलेल्या या शाहिराची सांगीतिक यशोगाथा मराठी रुपेरी पडद्यावर येणार असतानाच 'लोकशाहीर पठ्ठे बापूराव' यांच्या सुनेने श्रीमती नलिनी गोविंद कुलकर्णी यांनी श्री श्रीधर कृष्णा कुलकर्णी तथा लोकशाहीर पठ्ठे बापूराव यांच्या सर्व गोष्टींच्या एकमेव कायदेशीर वारस असल्याचे सांगितले आहे. याबाबत माहिती देण्यासाठी श्रीमती नलिनी गोविंद कुलकर्णी ह्यांनी पुण्यात एका पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, माझे सासरे अर्थात लोकशाहीर पठ्ठे बापूराव यांचे नाव वापरून व त्यांच्या जीवनावर आधारित कोणतीही चित्रफीत/ चित्रपट अथवा कोणत्याही दृक-श्राव्य स्वरूपाची इतर कोणतीही कलाकृती बनविण्यास/ साकारण्यास तसेच त्याची प्रदर्शन व विक्री करण्याकरिता दि.23/07/2024 रोजीच्या नोंदणीकृत हस्तांतरण कारारनाम्याने असमथी आणि ह्यूज प्रॉडक्शन्स यांना अधिकार दिलेले होते व आहेत.असमथी आणि ह्यूज प्रॉडक्शन्स यांच्याशिवाय 'लोकशाहीर पठ्ठे बापूराव' या नावाचा वापर करण्याचा अथवा त्यांच्या जीवनावर आधारित कोणतीही कलाकृती बनविण्याचा, त्याचेप्रदर्शन व विक्री करण्याचे कोणतेही कायदेशीर अधिकार प्राप्त नव्हते व नाहीत. यांच्या व्यतिरिक्त कोणी चित्रपट केल्यास त्यांच्यावर न्यायालयीन कारवाई केली जाईल, असं त्यांनी सप्ष्टपणे नमूद केलं आहे. प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या "महाराष्ट्राचे शिल्पकार पठ्ठे बापूराव" आणि "पठ्ठे बापूरावांच्या शोधात" या पुस्तकांवर आधारित हा चित्रपट असणार आहे. या पुस्तकांचे हक्क सुद्धा लिखीत स्वरूपात त्यांनी असमथी आणि ह्यूज प्रॉडक्शन्स यांच्या स्वाधीन केलेले आहेत. या परिषदेला लोकशाहीर पठ्ठे बापूराव ह्यांचा नातू अवधूत गोविंद कुलकर्णी आणि नात अपर्णा गोविंद कुलकर्णी उपस्थित होते.

# आ. तापकीर चौकार मारण्यासाठी सज्ज!

## चौथ्यांदा संधी : आज उमेदवारी अर्ज दाखल करणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)** खडकवासला विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी या अखेर घोषित करण्यात आली. त्यामुळे मतदारसंघातील उमेदवारी बाबत चा सस्पेन्स संपला आहे. इच्छुकांच्या तीव्र स्पर्धेतही विद्यमान आमदार भीमराव तापकिर यांना पुन्हा संधी मिळाली आहे. खडकवासला विधानसभेसाठी भारतीय जनता पार्टीने पुन्हा त्यांच्यावर विश्वास टाकला आहे. त्यामुळे आगामी विधानसभेमध्ये आमदार तापकीर चौकार मारणार का याकडेही नजरा लागल्या आहेत.

### सर्वांगीण विकास हेच ध्येय : आ. तापकीर

खडकवासला विधानसभेसाठी पक्षाने पुन्हा संधी दिल्याबद्दल खूप खूप आभारी आहे. मागील अनेक वर्षापासून खडकवासल्याच्या विकासासाठी आपण अविरतपणे प्रयत्न करत आहे. हजारो कोटींची विकासकामे केली व सुरूही आहेत. लवकरच ट्रॅफिकचाही प्रश्न सुटणार आहे. याशिवाय खडकवासला स्वारगेट खराडी, नळस्टॉप वारजे माणिकबाग मेट्रोलाही मंजुरी मिळाली आहे. समाविष्ट गावासाठी ही विविध योजनांसाठी निधी मंजूर करण्यात आले आहेत. ग्रामस्थांच्या वाढीव टॅक्स बाबत शासनाकडे ही पाठपुरावा केला त्यास यश मिळाले आहे. त्यामुळे मतदारांचा चांगला प्रतिसाद आपल्याला मिळणार आहे.

खडकवासला मतदारसंघासाठी केलेल्या हजारो कोटी रुपयाची विकास कामे त्यांनी मार्गी लावली. शिवाय नम्र व मृदू स्वभावामुळे त्यांनी कार्यकर्त्यांशी नाळ तुटू दिली नाही. त्यामुळेच खडकवासला विधानसभेसाठी पक्षाने पुन्हा संधी दिल्याचे समजते आहे. आतापर्यंत विधानसभेला सर्व उमेदवारांचा तापकीर यांनी पराजित केले आहे. आता ह्या निवडणुकीत विजय मिळवून मंत्रीपदाला गवसणी घालतील असा विश्वास कार्यकर्त्यांना वाटतो आहे.



खडकवासल्याचा चेहरा बदलण्याचा नक्की प्रयत्न करतोय.भारतीय जनता पार्टीच्या व महायुतीच्या एकजुटीने विधानसभेमध्ये मोठा विजय नक्की मिळेल. कारण खडकवासला हा भारतीय जनता पार्टीचा बालेकिल्ला आहे तो तसाच राहणार हा विश्वास आहे. दोन दिवसात उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. विजय नक्की मिळणार हा विश्वास नक्की आहे. - आ. भीमराव तापकीर, भाजपा उमेदवार

# आपल्या प्रियजनांचे संरक्षण करा : मेंदुज्वर प्रतिबंधाची शक्ती मिळवा

**पुणे (दै. आरंभ पर्व)** मेंदुज्वर हा साधारणपणे जिवाणू वा विषाणूंच्या संसर्गामुळे होतो. मेंदुज्वर हा एक गंभीर लस प्रतिबंधक संसर्ग आहे ज्यामध्ये विशेषतः लहान मुलांसाठी आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या निर्माण होतात. जागतिक मेंदुज्वर दिनाचे उद्दिष्ट जागरूकता वाढवणे आणि या आजाराला पराभूत करण्यासाठी जागतिक प्रयत्न चालवणे, लवकर ओळखण्याच्या आणि लसीकरणाद्वारे प्रतिबंध करण्याच्या जीवन वाचवण्याच्या क्षमतेला चालना देणे हे आहे. दरवर्षी जागतिक स्तरावर 2.5 दशलक्षाहून अधिक प्रकरणे नोंदवली जातात, मेंदुज्वर हे एक गंभीर आरोग्य संकट आहे. कारण या आजाराला बळी पडलेल्यांपैकी जवळपास 70 टक्के पाच वर्षाखालील मुले आहेत. मेंदुज्वर हे माणसाच्या



मणक्यातील जलाचे व मेंदुला असलेल्या आवरणजलाचे संक्रमण असते. कधीकधी त्याला मणक्याचा मेंदुज्वर देखील म्हणतात. मेंदुज्वर हा साधारणपणे जिवाणू वा विषाणूंच्या संसर्गामुळे होतो. हा कशाने झाला आहे हे जाणून घेणे गरजेचे असते कारण दोन्ही मध्ये उपचार वेगवेगळ्या पद्धतीचे असतात. वय वर्ष 2 च्या पुढील व्यक्तिंमध्ये, सामान्यतः खुप ताप, डोके दुखणे, मानेत लचका येणे अशी लक्षणे दिसू लागतात . संसर्ग झाल्यावर 2 ते 3 तासातच किंवा 1 ते 2 दिवसात लक्षणे दिसू लागतात. इतर लक्षणांमध्ये मळमळ, उलटया, प्रखर उजेड नकोसा होणे, घुटमळ आणि सुस्ती येणे आदींचा समावेश होतो. ज्वराचा जोर जास्त झाल्यावर त्वचेखाली जखमा होऊ लागतात. जन्मजात बालकांत लगेच रोग पसरतो, सामान्यपणे ताप, डोकेदुखी व मानदुखी ही लक्षणे पहायला मिळतात त्यामुळे लागण झाली आहे हे ओळखणे कठीण असते. बाळांमध्ये दिसून येणार्या इतर लक्षणांमध्ये मुलांतील उत्साह कमी होणे, चिडचिड वाढणे, उलट्या आणि कमी अन्न घेणे हे दिसून येते. जसा जसा रोग वाढतो तसे रुग्णाला फिट येऊ लागतात.

मेंदुज्वर-संबंधित मृत्यूची सर्वाधिक संख्या असलेल्या पहिल्या तीन देशांमध्ये भारताचा क्रमांक लागतो. तीव्र जिवाणू मेंदुज्वर होणा-या तीन रोगजनकांपैकी नीसेरिया मेनिन्जायटीस हे उपचार असूनही मृत्यूचे प्रमाण 15 टक्के पर्यंत आणि उपचार न केल्यावर 50% पर्यंत आहे. 5 ते 6 अभ्यासातून 2 वर्षांपेक्षा कमी वयाच्या भारतीय मुलांमध्ये तीव्र जिवाणू मेंदुज्वर होणा-या निसेरिया मेनिन्जाइटिसच्या घटनांमध्ये वाढ दर्शविली आहे. सुदैवाने, लस मेनिंजायटीसच्या काही सर्वात धोकादायक प्रकारांपासून संरक्षणाची एक महत्त्वपूर्ण मदत प्रदान करतात, व्यक्ती आणि समुदायांचे संरक्षण करण्यास मदत करतात.

डॉ. संपदा तांबोळकर, प्राध्यापिका आणि युनिट प्रमुख, बालरोग विभाग,

तुमचे मूल ९ महिने किंवा त्याहून अधिक वयाचे असल्यास, त्यांना इनवेसिव्ह मेनिन्गोकोकल रोगाविरूद्ध लस मिळाल्याची खात्री करा. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएचओ) ने २०३० पर्यंत बॅक्टेरियातील मेनिंजायटीस साथीच्या रोगांचे उच्चाटन करण्याच्या उद्देशाने एक रोडमॅप देखील लाँच केला आहे, लसीने प्रतिबंध करण्यायोग्य प्रकरणे ५० टक्के आणि मृत्यू ७० टक्के कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. आपण जागतिक मेंदुज्वर दिन साजरा करत असताना, आपण संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध होऊ या. आमची मुले आणि समुदाय. आज सक्रिय पावले उचलल्याने उद्याचे जीवन वाचू शकते, सर्वांसाठी एक निरोगी भविष्य सुनिश्चित करू शकते.

डॉ डी वाय पाटील वैद्यकीय महाविद्यालय, पुणे यांच्या मते, "लोकांना प्रादुर्भावापासून वाचवण्यात आणि या अत्यंत संसर्गजन्य रोगाचा प्रसार रोखण्यात लसीकरण महत्त्वाची भूमिका बजावते. उच्च-जोखीम असलेल्या व्यक्ती, जसे की रोगप्रतिकारशक्ती कमी झालेले, महाविद्यालयीन विद्यार्थी, परदेशात जाणारे विद्यार्थी, प्रवासी, गर्दीच्या वातावरणात राहणाऱ्या व्यक्तींनी लसीकरणास प्राधान्य दिले पाहिजे.

या प्राणघातक रोगाचा सामना करण्यासाठी, इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स (आयएपी) ने मेनिन्गोकोकल लसीची शिफारस 9-23 महिन्यांदरम्यान 2-डोस शेड्यूल आणि 2 वर्षांवरील एक डोस म्हणून केली आहे ज्यांना या रोगाचा धोका वाढतो.

खडकवासला विधानसभा मतदारसंघासाठी बसपा तर्फे

# अरुण गायकवाड यांचा उमेदवार अर्ज दाखल



**पुणे (दै. आरंभ पर्व)** खडकवासला विधानसभा मतदारसंघासाठी बहुजन समाज पार्टीने शहर प्रभारी अरुण गायकवाड यांना संधी दिली आहे. नुकताच अरुण गायकवाड यांनी आपला निवडणूक अर्ज सादर केला आहे.

भव्य दिव्य रिक्षा रॅली व धुमधडाक्यामध्ये त्यांनी आपला अर्ज भरला. बहुजन समाज पार्टीने खडकवासला मतदार संघ लढवण्याचे निश्चित केले असल्याने गायकवाड यांना संधी मिळाली आहे.

अरुण गायकवाड यांनी यापूर्वीही 2014 साली कोथरुड 2019 मध्ये खडकवासला मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढविली आहे.

यंदा तिसरी निवडणूक लढवत आहेत. काशीराम साहेब व बहनजी मायावती यांच्या विचाराला प्रेरित होऊन खडकवासल्याचा मतदार मला सहकार्य करेल . मी विजयी होईल असा विश्वास गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर व्यक्त केला. निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत माने यांच्याकडे हा निवडणूक अर्ज सादर केला. त्यावेळी पुणे जिल्हा अध्यक्ष दिलीप कुसाळे, जिल्हा प्रभारी शितल गायकवाड, त्यांच्या पत्नी उज्वला गायकवाड, प्रीती गायकवाड आबा लांडगे, अतिश लांडगे व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# मेंदुज्वर जागरुकता : लसीकरणाद्वारे जीव वाचविण्यास मदत

**पुणे (दै. आरंभ पर्व)** मेंदुज्वर हा एक गंभीर लस प्रतिबंधक संसर्ग आहे ज्यामध्ये विशेषतः लहान मुलांसाठी आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या निर्माण होतात. जागतिक मेंदुज्वर दिनाचे उद्दिष्ट जागरुकता वाढवणे आणि या आजाराला पराभूत करण्यासाठी जागतिक प्रयत्न चालवणे, लवकर ओळखण्याच्या आणि लसीकरणाद्वारे प्रतिबंध करण्याच्या जीवन वाचवण्याच्या क्षमतेला चालना देणे हे आहे.

दरवर्षी जागतिक स्तरावर 2.5 दशलक्षाहून अधिक प्रकरणे नोंदवली जातात, मेंदूज्वर हे एक गंभीर आरोग्य संकट आहे, कारण या आजाराला बळी पडलेल्यांपैकी जवळपास 70 टक्के पाच वर्षांखालील मुले आहेत. वय वर्ष 2 च्या पुढील व्यक्तिंमध्ये, सामान्यतः खुप ताप, डोके दुखणे, मानेत लचका येणे अशी लक्षणे दिसू लागतात . संसर्ग झाल्यावर 2 ते 3 तासातच किंवा 1 ते 2 दिवसात लक्षणे दिसू लागतात. इतर लक्षणांमध्ये मळमळ, उलटया, प्रखर उजेड नकोसा



होणे, घुटमळ आणि सुस्ती येणे आदींचा समावेश होतो. ज्वराचा जोर जास्त झाल्यावर त्वचेखाली जखमा होऊ लागतात. जन्मजात बालकांत लगेच रोग पसरतो, सामान्यपणे ताप, डोकेदुखी व मानदुखी ही लक्षणे पहायला मिळतात त्यामुळे लागण झाली आहे हे ओळखणे कठीण असते. बाळांमध्ये दिसून येणार्या इतर लक्षणांमध्ये मुलांतील उत्साह कमी होणे, चिडचिड वाढणे, उलट्या आणि कमी अन्न घेणे हे दिसून येते. जसा जसा रोग वाढतो तसे रुग्णाला फिट येऊ लागतात. मेंनिंजायटीस-संबंधित मृत्यूची सर्वाधिक संख्या असलेल्या पहिल्या तीन देशांमध्ये भारताचा क्रमांक

या प्राणघातक रोगाचा सामना करण्यासाठी, इंडियन अकादमी ऑफ पेडियाट्रिक्स (आयएपी) ने मेनिन्गोकोकल लसीची शिफारस ९-२३ महिन्यांदरम्यान २ डोस शेड्यूल आणि २ वर्षांवरील एक डोस म्हणून केली आहे ज्यांना या रोगाचा धोका वाढतो. तुमचे मूल ९ महिने किंवा त्याहून अधिक वयाचे असल्यास, त्यांना इनवेसिव्ह मेनिन्गोकोकल रोगाविरूद्ध लस मिळाल्याची खात्री करा. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएचओ) ने २०३० पर्यंत बॅक्टेरियातील मेनिंजायटीस साथीच्या रोगांचे उच्चाटन करण्याच्या उद्देशाने एक रोडमॅप देखील लाँच केला आहे, लसीने प्रतिबंध करण्यायोग्य प्रकरणे ५० टक्के आणि मृत्यू ७० टक्के कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. आपण जागतिक मेंदुज्वर दिन साजरा करत असताना, आमची मुले आणि समुदायासाठी संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध होऊ या. आज सक्रिय पावले उचलल्याने उद्याचे जीवन वाचू शकते, सर्वांसाठी एक निरोगी भविष्य सुनिश्चित करू शकते.

लागतो. तीव्र जिवाणू मेंदुज्वर होणा-या तीन रोगजनकांपैकी नीसेरिया मेनिन्जायटीस हे उपचार असूनही मृत्यूचे प्रमाण 15 टक्क्यांपर्यंत आणि उपचार न केल्यावर 50 टक्क्यांपर्यंत आहे. 5 ते 6 अभ्यासांनी 2 वर्षांपेक्षा कमी वयाच्या भारतीय मुलांमध्ये तीव्र जिवाणू मेंदुज्वर होणाऱ्या निसेरिया मेनिन्जाइटिसच्या घटनांमध्ये वाढ दर्शविली आहे.

"जागतिक आरोग्य धोक्यात असलेल्या मेंदुज्वर दूर करण्यासाठी लसीकरण ही आमची सर्वोत्तम संधी आहे. हा एक सिद्ध, सुरक्षित आणि प्रभावी उपाय आहे जो दररोज जीव वाचवतो, असे कार्तिक हॉस्पिटलचे बालरोगतज्ञ डॉ. जगदीश ढेकणे यांनी सांगितले. उच्च-जोखीम असलेल्या व्यक्ती, जसे की रोगप्रतिकारक शक्ती कमी झालेले, महाविद्यालयीन विद्यार्थी, परदेशात जाणारे विद्यार्थी, प्रवासी, राहणाऱ्या व्यक्ती गर्दीच्या वातावरणात लसीकरणाला प्राधान्य दिले पाहिजे.

## *महायुतीच्या पायाभूत सुविधा आणि जनकल्याणाला कौल मिळणार*

**पुणे (दै. आरंभ पर्व)** नुकत्याच झालेल्या सीएसडीएस.-लोकनीतिच्या निवडणुकीपूर्वीच्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की, महाराष्ट्र राज्य निवडणुकांपूर्वी पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी उपक्रमांना मोठ्या प्रमाणात सार्वजनिक मान्यता मिळाल्याने भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुति आघाडीला फायदा होणार आहे. सार्वजनिक वाहतूक, वीज, पाणीपुरवठा आणि स्वच्छता यासारख्या क्षेत्रांमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली लक्षणीय सुधारणा झाल्या आहेत, ज्यामुळे सत्ताधारी महायुतीला निवडणुकीत मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. ही कामगिरी मतदारांमध्ये प्रतिध्वनित होत असल्याचे दिसते, युती पुन्हा सत्तेत आल्यास फडणवीस हे मुख्यमंत्रीपदासाठी प्रबळ दावेदार समजले जात आहे. सर्वेक्षणानुसार, पायाभूत सुविधा विकासामुळे महाराष्ट्राचा कायापालट झाला कारण महायुति सरकारला सार्वजनिक मान्यता देणाऱ्या प्रमुख घटकांपैकी एक म्हणजे त्याचा पायाभूत सुविधा विकास म्हणावा लागेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अद्ययावत करणे, रस्ते जोडणी वाढवणे आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देणे यासाठीचे सरकारचे प्रयत्न हे फडणवीस यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य बनले असल्याचे दिसून येत आहे. हे उपक्रम केवळ शहरी भागापुरते मर्यादित नव्हते तर ग्रामीण भागांनाही फायदा झाला आहे, रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या लक्षणीय गुंतवणूकीमुळे मागील काही वर्षांत आरोग्यसेवा आणि शिक्षणासारख्या अत्यावश्यक सेवा अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध झाल्या आहेत. कल्याणकारी योजनांना जनसहभाग वाढावा यासाठी महायुति सरकारमधील कल्याणकारी कार्यक्रमांनीही मतदारांना प्रभावित केले आहे. माझी लाडकी बाहिन सारख्या उपक्रमांमुळे 2 कोटींहून अधिक महिलांना लाभ झाला आणि वंचित कुटुंबांना तीन मोफत गॅस सिलिंडरचे वितरण करण्यात आले, ज्यांचे जीवनमान सुधारण्यावर आणि सामाजिक समानतेला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित केल्याबद्दल राज्यभरातून कौतुक करण्यात आले आहे. अनुसूचित जाती/जमाती समुदाय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसारख्या असुरक्षित गटांना प्राधान्य देणाऱ्या सरकारच्या या विविध उपक्रमांमुळे जनतेचे समाधान झाले, ज्यामुळे ते आधीच्या महाविकास आघाडी प्रशासनापेक्षा वेगळे आहे अशी प्रतिक्रिया येत आहेत.

# नवनाथदादा पारगे यांचा अपक्ष लढण्याचा निर्धार!

## डोणजेतील मेळाव्यात कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर निर्णय : मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)** खडकवासला विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला बंडखोरीचा सामना करावा लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पक्षाचे नेते, माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ दादा पारगे यांनी अपक्ष लढण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. डोणजेत काल झालेल्या कार्यकर्ता बैठकीत कार्यकर्त्यांनी निवडणूक लढवण्याची मागणी केली. त्यावेळी पारगे यांनी निर्णय घेतला आहे. पक्षाच्या उमेदवारीसाठी पारगे यांना डावलल्याने कार्यकर्ते अस्वस्थ व नाराज आहेत. जनता हाच माझा पक्ष म्हणून ते खडकवासला विधानसभा निवडणुकीच लढणार आहेत याबाबत त्यांच्याशी संपर्क साधला असता

जनतेच्या आग्रहाखातर एखादा निर्णय घ्यावाच लागतो..एवढी वर्षे पक्षासाठी काम करूनही पक्ष नाकारत असेल तर किती दिवस थांबणार मंगळवारी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करतोय. खडकवासला मतदारसंघात युवकांना संधी मिळायला हवी. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडे आपण उमेदवारीसाठी प्रयत्न करत होतो परंतु त्यात अपयश आले. यामुळे माझे कार्यकर्ते व निराश झाले त्यामुळे त्यांच्या आग्रहाकडून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेत आहे. वरिष्ठांशी चर्चा झाली तरीही माझा अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम आहे. असेही नवनाथ पारगे यांनी सांगितले.



## थोडक्यात



### राजमाता महिला महासंघातर्फे महिला बचत गटाना दिवाळी भेटवस्तू

● राष्ट्रसेवा समूहाचा अभिनव उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : दीपावली सणाचे औचित्य साधून राजमाता महिला महासंघातर्फे बचत गटातील महिलांना दिवाळी भेटवस्तू वाटप करण्यात आले. याचे नियोजन राष्ट्रसेवा समूहाचे संस्थापक अध्यक्ष राहुलभाऊ पोकळे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले.यावेळी महिलांनी गर्दी करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गेली अनेक वर्षापासून धायरी व पुणे शहरामध्ये राष्ट्रसेवा समूह विविध उपक्रम घेत आहे. नुकतेच लाडक्या बहिन योजनेचे अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे. यावेळी राहुलभाऊ पोकळे,बाबासाहेब जोरे,तुषार कुंभार,अतुल पोकळे,स्वप्नील पातूरकर,राहुल जाधव,रणजीत जोरे,प्रसाद पोकळे,सागर जाधव,स्मिता पोकळे, भाग्यश्री काळे, गौरी कुंभार,ज्योती कुंभार रूपाली रायकर,सुजाता डोळस, सोनाली पोकळे,प्रिया पातुरकर, साधना सांगळे,स्वाती जाधव अंकिता जाधव,प्राची प्रातुरकर, भारती पोकळे वनिता पोकळे. व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# खडकवासल्यात "सचिन "अस्त्र !

## राष्ट्रवादीला जिंकवणार?



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इच्छुकांची संख्या जास्त असलेल्या खडकवासला विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी अखेर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी घोषित केली. त्यामध्ये खडकवासला विधानसभा मतदारसंघातून माजी नगरसेवक सचिन दोडके यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

2019 साली भाजपाला तगडी फाईट देणारे सचिन अस्त्र यावेळेस तरी विधानसभेट पोहोचणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.उमेदवारी घोषित होताच दोडके यांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष व्यक्त केला. दोडके हे तीन टर्म पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक म्हणून कार्यरत आहेत.

पक्षाध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या संमतीने काही निवडीचे निकष ठेवण्यात आले होते. त्या आधारे या निवडी करण्यात आल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले. खडकवासला मतदारसंघांमध्ये यंदा तिरंगी किंवा चौरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

## पक्षीय श्रेष्ठींचे आभार; खडकवासल्यात परिवर्तन नक्की होणार : दोडके

खडकवासला विधानसभेसाठी पुन्हा एकदा मला संधी दिल्याबद्दल पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार साहेब खासदार सुप्रियाताई सुळे , प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, एका सामान्य कार्यकर्त्याला पुन्हा संधी दिली त्याबद्दल मनःपूर्वक आभारी आहे. खडकवासल्याच्या विकासासाठी विकासाचे मॉडेल तयार करून पंधरा वर्षाचा विकासाचा बॅकलाग पूर्ण करण्याचं धेय्य नक्की गाठायच आहे. अशी भावना दोडके यांनी आरंभपर्व कडे व्यक्त केली. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील अनेक समस्या जैसे थे आहेत. त्या सोडण्यासाठी मी नक्कीच प्रयत्न करणार आहे.

गेली अनेक महिन्यापासून खडकवासला मतदारसंघांमध्ये ते सक्रिय होत खडकवासला मतदारसंघांमध्ये उमेदवारी घोषित होण्याच्या अगोदरच प्रचार सुरु केला होता.

मागील विधानसभा निवडणुकीमध्ये शेवटच्या फेरीपर्यंत अक्षरशःझुंजुवून ठेवले होते. मात्र केवळ अडीच हजार मतांनी त्यांचा पराभव झाला होता. त्यावेळी सर्व कार्यकर्ते निराश झाले होते. खुद्द पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही दोडकेंची प्रशंसा केली होती.

आता जिद्दीने लढायचं.. ध्येय गाठायचं. असं म्हणत 2019 सालीच त्यांची उमेदवारी पक्की झाल्याचे संकेत त्यावेळी त्यांनी दिले होते.

गेल्या वेळी अल्पमतानी आपण विधानसभेपर्यंत पोहोचू शकलो नव्हतो. यंदा मात्र खडकवासल्यात असल्यामुळे परिवर्तन नक्की होणार आहे. ही निवडणूक मतदारांनी हातामध्ये घेतली आहे. त्यामुळे आगामी विधानसभेमध्ये मी जाणार हा आत्मविश्वास मला नक्की वाटतो. माझे सर्व सहकारीही विधानसभेसाठी मला सहकार्य करतील. यात मला कोणतीही शंका नाही. लढत कशीही होऊ द्या परंतु आमचा विजय होणारच हे आत्मविश्वासाने सांगतो.लवकरच खा .सुप्रियाताई सुळे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.

- सचिन दोडके, उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)

## ओळख उमेदवारांची : खडकवासला - सचिन दोडके

सचिन दोडके - उमेदवार - शिक्षण - बारावी - पक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

वारजे येथील शेतकरी कुटुंबातून दोडके पुढे आले. बालपणी वडिलांचे छत्र हरपल्यानंतर आईने शेती व किराणा दुकानाचा व्यवसाय करून कुटुंबाला सावरले. बालपणापासूनच आजोबांसमवेत राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये (एनडीए) गेलेल्या त्यांच्यासह अन्य कुटुंबांची शेती, जमिनींसाठी काम करण्यास सुरुवात केली. विद्यार्थिदशेतच राष्ट्रवादी काँग्रेससमवेत जोडले गेले. शरद पवार, अजित पवार, सुप्रिया सुळे यांच्याशी त्यांची जवळीक वाढली. पक्षाने २०१९ मध्ये विधानसभेची संधी दिली; मात्र थोड्या फरकाने अपयश आले. पक्षफुटीनंतर शरद पवार, सुप्रिया सुळे यांच्यासमवेत ते राहिले. महामार्गालगत सेवारस्ते, सुशोभीकरण, क्रीडांगणे, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स अशी कामे करत थेट लोकांशी संपर्क ठेवला. नितीन गडकरी, सुप्रिया सुळे यांच्या माध्यमातून वडगाव, वारजे येथे नदीवर ५२ कोटींच्या उड्डाणपुलाचे काम आणले. २०१९च्या विधानसभा निवडणुकीत झालेला निसटता पराभव प्रत्येकाच्या मनाला लागला. यावेळी पक्षाचा विश्वास सार्थ करून विजय खेचून आणू.

राजकीय कारकीर्द : २०१९ विधानसभा निवडणुकीत निसटता पराभव- विविध कार्यक्रम, उपक्रम, संस्थांद्वारे नागरिक, कार्यकर्त्यांशी कायम संपर्क- लोकसभा निवडणुकीत पक्षाला प्रबळ बनविण्यात भूमिका




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.